महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२ २२८५२६३५.

---

क्रमांक- दुरूस्ती-२०१९/प्र.क्र.४५/आस्था-३. दिनांक- ०५ जानेवारी, २०२१.

# प्रसिध्दी पत्रक

**विषय:**-गृह विभागातील कार्यालयीन वापरासाठी असलेल्या संगणक, प्रिंटरची देखभाल व दुरूस्ती व टोनरची रिफीलींग तसेच झेरॉक्स मशीनची देखभाल व दुरूस्ती करण्याबाबतची दरपत्रके मागविणेबाबत.

गृह विभागातील दैनिंदिन कामकाजासाठी लागणाऱ्या संगणक, प्रिंटर व झेरॉक्स मशीनची देखभाल दुरूस्ती व परिरक्षणासाठी , नव्याने सेवा संविदेचा वार्षिक करार करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरहू संगणक, प्रिंटर व झेरॉक्स मशीनची सेवा संविदा पुरविण्यासाठीचे जे पुरवठादार दर पत्रकावर मुक्रर केलेले असतील व सदर कामाचा ३ वर्षाचा अनुभव असलेल्या पुरवठादरांची दरपत्रके सीलबंद लखोट्यात मागविण्यात येत आहेत. अशा पुरवठादारांनी कृपया त्यांची दरपत्रके ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांच्या आत म्हणजे दि. १२ जानेवारी, २०२१ रोजी ३.०० वाजे पर्यंत सह सचिव (आस्था-३), गृह विभाग, दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२ यांचे नावे विहित मार्गाने सादर करावीत. सदर मुदतीनंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

२. सदर प्रसिध्दी पत्रक माझ्या सही शिक्यांनिशी आज दि. ०५.०१.२०२१ रोजी महाराष्ट्र राज्य शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सोबतचे प्रपत्र अ व ब पहावे

हातगे

(अनुश्री रा.हातगे)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

## प्रपत्र – अ
## अटी व शर्ती
## संगणक व प्रिंटर दुरुस्ती व देखभाल

१) मोहरबंद लिफाफ्यावर संगणक व प्रिंटर दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी दरपत्रक असे लिहिणे आवश्यक आहे.

२) दरपत्रक सादर करावयाचे ठिकाण :- गृह विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, विस्तार इमारत, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

३) प्राप्त दरपत्रक दिनांक १९.०१.२०२१ रोजी दुपारी ठिक ०३.०० वाजता सह सचिव, (आस्था-३), गृह विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, विस्तार इमारत, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे उघडण्यात येतील. दरपत्रक उघडतेवेळी स्वत: किंवा आपला प्रतिनिधी उपस्थितीत राहू शकतो.

४) दरपत्रकात नमूद दर हे स्विकृतीनंतर १ वर्षासाठी लागू राहतील. सदर करारास आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात येईल.

५) दर करार केल्यानंतर संगणक, प्रिंटर दुरुस्ती व देखभालीची संपूर्ण जबाबदारी करार करणाऱ्या संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच सदर कालावधीत संस्थेला साहित्य कोणताही जास्तीचा दर न आकारता बदलून द्यावे लागेल. तसेच सदर दुरूस्तीचा खर्चाची रक्कम संगणक बाबींच्या किंमतीच्या ८-१०% किंमती पेक्षा जास्त नसावी.

६) प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

७) संगणक, प्रिंटरचे नादुरुस्त सुट्टे भाग ओरिजनल कंपनीचेच असावे.

८) दरपत्रक सादर करताना लिफाफा सिलबंद करुन सादर करावा.

९) पुरवठादार संस्थेस संगणक, प्रिंटर दुरुस्ती व देखभाली करिता फोन केल्यानंतर २४ तासात संगणक, प्रिंटर दुरुस्त करुन देण्यात यावे.

१०) कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रक नाकारण्याचा हक्क सह सचिव (आस्था-३) यांना राखून ठेवत आहे.

११) प्रत्येक पुरवठादाराचे फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

१२) संगणक, प्रिंटर दुरूस्तीचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१३) GST व PAN नंबर नमूद करण्यात यावा.

## प्रपत्र - ब
## अटी व शर्ती
## झेरॉक्स मशिन दुरुस्ती व देखभाल

१) मोहरबंद लिफाफ्यावर झेरॉक्स मशिन दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी दरपत्रक असे लिहिणे आवश्यक आहे.

२) दरपत्रक सादर करावयाचे ठिकाण :- गृह विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, विस्तार इमारत, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

३) प्राप्त दरपत्रक दिनांक १९.१२.२०२१ रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता सह सचिव, (आस्था-३), गृह विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, विस्तार इमारत, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे उघडण्यात येतील. दरपत्रक उघडतेवेळी स्वत: किंवा आपला प्रतिनिधी उपस्थितीत राहू शकतो.

४) दरपत्रकात नमूद दर हे स्विकृतीनंतर १ वर्षासाठी लागू राहतील. सदर करारास आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात येईल.

५) दर करार केल्यानंतर झेरॉक्स मशिन दुरुस्ती व देखभालीची संपूर्ण जबाबदारी करार करणाऱ्या संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच सदर कालावधीत संस्थेला साहित्य कोणताही जास्तीचा दर न आकारता बदलून द्यावे लागेल. तसेच सदर दुरूस्तीचा खर्चाची रक्कम झेरॉक्स मशीनच्य किंमतीच्या ८-१०% किंमती पेक्षा जास्त नसावी.

६) प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

७) झेरॉक्स मशिनचे नादुरुस्त सुट्टे भाग ओरिजनल कंपनीचेच असावे.

८) दरपत्रक सादर करताना लिफाफा सिलबंद करुन सादर करावा.

९) पुरवठादार संस्थेस झेरॉक्स मशिन दुरुस्ती व देखभाली करिता फोन केल्यानंतर २४ तासात झोरॉक्स, दुरुस्त करुन देण्यात यावे.

१०) कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रक नाकारण्याचा हक्क सह सचिव (आस्था-३) यांना राखून ठेवत आहे.

११) प्रत्येक पुरवठादाराचे फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

१२) झेरॉक्स मशिन दुरूस्तीचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१३) GST व PAN नंबर नमूद करण्यात यावा.